# ई- निविदा अंतर्गत निविदा सूचना (पहिली वेळ)

## बी.१ निविदा सूचना क्र.१ सन २०२६-२७

## ग्रामपंचायत विडणी

## तालुका फलटण जिल्हा सातारा

सरपंच ग्रामपंचायत विडणी तालुका फलटण हे योग्य त्या वर्गातील नोंदणीकृत मक्तेदाराकडून टक्केवारी स्वरूपात दोन लिफाफा पद्धतीने पुढील कामाची निविदा मागविणेत येत आहे.

| अ नं | कामाचे नाव | निविदा रक्कम रु. | बयाना रक्कम | टेंडर फी रक्कम रु | कामाची मुदत | ठेकेदाराचा प्रकार |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | मौजे विडणी ता.फलटण जि.सातारा येथे नवीन स्वागत कमान करणे. | ११,६२,५२८/- | ११,६२५/- | ५००/- | १८० दिवस | सुशिक्षित बेरोजगार अभियंता |

१. सदर संपूर्ण निविदा प्रक्रिया ऑनलाईन पद्धतीने होईल सदर निविदेसंदर्भात निविदा नोटीस, प्रसिद्धी, सूचना शुद्धिपत्रके इत्यादी ची माहिती निविदेच्या अटी व शर्ती http://www.mahatenders.gov.in या संकेत स्थळावर करून देण्यात आलेली आहे.

२. वरील कामाची कोरी निविदा, प्रपत्रे http://www.mahatenders.gov.in या संकेत स्थळावरून दि.१४/०५/२०२६ रोजी स.११.०० वा ते दि.२१/०५/२०२६ रोजी दु. १२.०० पर्यंत कोरी निविदा फी भरून उपलब्ध करून घ्याव्यात.

३. वरील कामाच्या http://www.mahatenders.gov.in या संकेत स्थळावर दि.१४/०५/२०२६ रोजी स.११.०० वा ते दि.२१/०५/२०२६ रोजी दु. १२.०० ऑनलाईन दोन लिफाफा पद्धतीने सादर करता येईल.

४. निविदेमधील अटी व शर्तीमध्ये बदल करणे प्राप्त निविदांपैकी एक किंवा सर्व निविदा कोणतेही कारण न देता नाकारनेचा हक्क निम्न स्वाक्षरीत राखून ठेवला आहे. निविदा सादर करणाऱ्या कोणत्याही ठेकेदारास निविदा फेटाळल्या बाबत स्पष्टीकरण मागता येणार नाही. तसेच एखाद्या कामाची निकड लक्षात घेता निवेदेतील त्या कामासाठी एखादी अट शिथिल करण्याचा हक्क निम्न स्वाक्षरीत राखून ठेवला आहे.

५. सदर कामाची टेंडर फी व बयाना रक्कम http://www.mahatenders.gov.in या संकेत स्थळावर भरून त्याची पावती लिफाफा क्रमांक.१ मध्ये जोडण्यात यावी.

६. सादर केलेले निविदा दिनांक २२/०५/२०२६ रोजी स. १२.०० ग्रामपंचायत कार्यालयात उघडण्यात येतील सदर दिवशी निविदा उघडणे शक्य न झाल्यास कार्यालयाच्या वेळेच्या सोयीनुसार उघडण्यात येतील.

**अ) तांत्रिक लिफाफा/लिफाफा क्र.1**

• निविदा फी व बयाना रक्कम भरणा केलेली प्रत.

• वैध नोंदणी प्रमाणपत्र.

• पॅन कार्ड जीएसटी रजिस्ट्रेशन सर्टिफिकेट व सन (२०२२-२३,२०२३-२४,२०२४-२५) ची आयकर भरलेले प्रमाणपत्र/ऑडिट फाईल.

• विहित नमुन्यातील ठेकेदाराचे बंधपत्र(Bidder Declaration)

• Statement No I to IV.

• मागील ५ **वर्षांमध्ये किमान १ समान प्रकारचे काम** पूर्ण केलेले असावे. त्या कामाची किंमत चालू निविदेच्या अंदाजित रक्कमेच्या **किमान ६०% किंवा त्यापेक्षा जास्त** असावी.

• निविदाधारकांनी सदर कामासाठी निविदा सादर करण्यापूर्वी कामाचे स्थळ प्रत्यक्ष पाहणी करून, स्थळाची परिस्थिती, उपलब्ध सुविधा, वाहतूक व्यवस्था, स्थानिक अडचणी, भौगोलिक परिस्थिती तसेच कामाच्या अंमलबजावणीस आवश्यक असणाऱ्या सर्व बाबींची पूर्ण माहिती करून घेणे बंधनकारक राहील. स्थळ पाहणी न करता निविदा सादर केल्यास किंवा स्थळावरील परिस्थितीबाबत अज्ञान असल्याचे कारण पुढे करून कोणताही अतिरिक्त खर्च, मुदतवाढ किंवा तक्रार मान्य करण्यात येणार नाही.

• निविदाधारकाने स्थळ पाहणी केली असल्याचा लेखी पुरावा / प्रमाणपत्र (Site Visit Certificate) निविदेसोबत सादर करणे आवश्यक राहील.

• मक्तेदाराचा बँक खाते क्र. बँकेचे नाव व शाखा, आय एफ एस सी कोड, संपर्क क्र, ई मेल आय डी याची माहिती.

•निविदे मध्ये सादर करण्यात आलेली सर्व कागदपत्रे सत्य असलेबाबत रक्कम रु.100 स्टॅम्प पेपर वरील प्रतिज्ञापत्र.

**निविदा संदर्भातील इतर अटी व शर्ती :-**

१.ठेकेदारांनी दोन लिफाफा पद्धतीने निविदा सादर करणे गरजेचे आहे. तांत्रिक लिफाफा मध्ये सर्व तांत्रिक कागदपत्रे व व्यापारी लिफाफा मधील BOQ मध्ये आपला लेखी दर नमूद करून सादर करावा.

२. निविदा धारकांनी कामाचे नकाशे निविदेतील अटी व शर्ती बाबनिहाय कामाचे स्थळ मजूर व साहित्याची उपलब्धता या सर्व बाबीचा अभ्यास करून निविदा सादर कराव्यात.

३. लिफाफा क्रमांक एक मधील सर्व कागदपत्राची छाननी करून लिफाफा क्र.१ मध्ये पात्र ठरलेल्या ठेकेदारांचा लिफाफा क्र.२ उघडण्यात येईल.

४. कोणत्याही अटीवर आधारित असलेल्या निविदा स्वीकारल्या जाणार नाहीत अथवा स्वीकारल्या तरी त्या मंजूर केल्या जाणार नाहीत.

५. मक्तेदारानी सादर केलेली निविदा व त्या निवेदेमधील दर लिफाफा क्र.२ उघडले नंतर १८० दिवसांपर्यंत वैद्य राहतील कंत्राटदाराचा देकार १८० दिवस राहील.

७. अंदाजपत्रक दरापेक्षा कमी दराच्या निविदा भरल्यास शासन निर्णय क्र. बिडिजी/२०१६/प्र क्रं/२/इमा.२/मंत्रालय मुंबई 400032 दिनांक.१२/०२/२०१६ व जिल्हा परिषद स्थायी समिती ठराव क्रमांक ५७७ दि.०७/०५/२०१६ नुसार १० टक्केपर्यंत कमी दर भरल्यास १ टक्का विशेष सुरक्षा ठेव तसेच १० टक्के पेक्षा जेवढ्या दराने कमी आहे त्याच्या प्रत्येक टक्यास १ टक्का (उदा.१४ टक्के कमी दर असल्यास १० टक्के पर्यंत १ टक्का व वरील ४ टक्के असे एकूण ५ टक्के तसेच १५ टक्के पेक्षा जादा कमी दराने निविदास सादर केलेस पुढील १ टक्के साठी २ टक्के याप्रमाणे विशेष सुरक्षा ठेव जमा करावी लागेल. रकमेची बँक गॅरंटी अथवा धनाकर्ष सरपंच ग्रामपंचायत विडणी यांचे नावे विशेष सुरक्षा ठेव म्हणून काढण्यात यावा व तो सरकारी बँक किंवा शेड्युल बँकेचा तसेच फलटण येथे देय असलेला असावा

धनाकर्षावरती MICR व IFSC कोड नंबर असणे आवश्यक आहे. निविदा उघडल्यानंतर ज्या ठेकेदाराची निविदा सर्वापेक्षा वजा कमी दराची असेल त्या ठेकेदारांनी ग्रामपंचायत विडणी यांचे पत्र प्राप्त झाल्यावर तीन कार्यालयीन दिवसात ग्रामपंचायत विडणी तालुका फलटण यांचे कार्यालयात सदरचा धनाकर्ष अथवा बँक गॅरंटी समक्ष जमा करावे. ज्या ठेकेदाराचा धनाकर्ष अथवा बँक गॅरंटी विहित मुदतीत कार्यालयास प्राप्त होणार नाही. अथवा चुकीचा धनाकर्ष बँक गॅरंटी जमा केलेस अशा ठेकेदारांची भरलेली निविदा ना मंजूर करण्यात येईल व पुढील निविदा धारकास संधी देण्यात येईल. तसेच धनाकर्षाची मुदत निविदा भरण्याच्या दिनांका नंतर किमान तीन महिने पर्यंत असणे आवश्यक आहे. तसेच सदरचा धनाकर्ष हा निविदा प्रसिद्धी झालेल्या दिनांकाचा अथवा त्यानंतरचा असावा तसेच सदरचा धनाकर्षक किंवा बँक गॅरंटी संबंधित ठेकेदाराचे बँक खाते वरून काढलेली असावी.०१ जुलै २०१७ नंतर शासनाने शासकीय कंत्राटदार जीएसटी कर लागू केलेल्या असल्याने सदर निविदा रकमेवर नियमाप्रमाणे जीएसटी चा कराची आकारणी केली जाणार आहे त्यामुळे सदर निविदेचे दर नमूद करताना कंत्राटदार यांनी जीएसटी चा विचार करून निवेद्येचे दर नोंद करावेत तसेच कामाचे देखे अदा करताना शासकीय नियमाप्रमाणे कपात कराव्या लागणाऱ्या सर्व रक्कम नियमाप्रमाणे कपात करण्यात येतील.

९.निविदे मधील सर्व वाद कोणतीही अटी व सर्दी पूर्ण न करणाऱ्या तंत्रज्ञाची निविदा व अर्धवट सादर केलेल्या निविदा अपत्र समजल्या जातील.

१०. ज्या ठेकेदाराची निविदा मंजूर होईल त्याने सुरक्षा अनामत ग्रामपंचायततिकडे भरणा करावी लागेल त्यापैकी निविदा मंजुरीनंतर सात दिवसाचे आत एकूण सुरक्षा ठेव पैकी ५० टक्के रक्कम ग्रामपंचायत कडे जमा करावे व उर्वरित पन्नास टक्के रक्कम कामाच्या पहिल्या देयका वेळी कपात करून घेतली जाईल. प्रथम सुरक्षा ठेव रक्कम ५० टक्के जमा केल्याशिवाय करारनामा अथवा कार्यारंभ आदेश दिला जाणार नाही. विहित मुदतीत करारनामा करून सुरक्षा ठेव ग्रामपंचायतकडे मुक्तदाराने जमा न केल्यास अथवा काम करण्यास नकार दिलेस सदर मक्तेदारास कामाची गरज नाही असे समजून त्याची मंजूर झालेली ई-निविदा ना मंजूर करण्यात येईल व सदर मक्तेदाराची बयाना रक्कम जप्त करून त्यास काळ्या यादीत टाकण्यात येईल त्यानंतर द्वितीय निम्नदराच्या मक्तेदारास प्रथम निम्नस्तर दराने काम करण्याची संधी देण्यात येईल.

११. शासन परिपत्रक ग्रामविकास व जलसंधारण विभाग क्र. पसस/1001/प्र. क.40/जल 3/ दिनांक 11/10/2001 अन्वये मक्तेदाराकडून वसूल केलेली 5 टक्के इतकी रक्कम दोष दायित्व कालावधीसाठी 1 वर्ष ग्रामपंचायतकडे राखून ठेवण्यात येईल. सदरचा दोष दायित्व कालावधी समाप्तीनंतरच मक्तेदारास परत केली जाईल तसेच सदर रकमेवर कोणत्याही प्रकारचे व्याज ग्रामपंचायत कडून देय असणार नाही.

१२. सदरच्या निविदा नोटीस मधील अटी व शर्ती शिवाय इतर आवश्यक त्या अटी व शर्तींचा समावेश प्रत्यक्ष करारनामा करताना करण्यात येईल.

१३. सदर निविदेबाबत कोणताही तंटा अगर वाद निर्माण झाल्यास त्याबाबत कोणत्याही न्यायालयात दावा दाखल करता येणार नाही. याबाबत ग्रामपंचायत चा निर्णय अंतिम राहील.

१४. निविदासंदर्भातील जमा झालेली 1 टक्के बयाना रक्कम ज्याची निविदा मंजूर होईल त्यास काम सुरू झाल्यानंतर परत दिली जाईल व ज्यांची निविदा ना मंजूर होईल त्यांनी ग्रामपंचायतीकडे बयाना रक्कम मागणी करणे गरजेचे नाही त्यांची बयाना रक्कम त्यांनी ज्या बँक खात्यावरून भरणा केली आहे त्याच बँक खात्यामध्ये आपोआप जमा होईल.

१५. निविदा प्रक्रिया संदर्भात संगणकृत प्रणाली द्वारे भ्रमणध्वनीवर संदेश पाठवला जातो तसेच काही वेळा संदेश प्राप्त झाला नाही तरीही निविदा कार्यवाही प्रक्रिया पाहण्याची जबाबदारी संबंधित निविदधारकाची राहील याबाबत या कार्यालयाकडून स्वतंत्रपणे कोणताही पत्रव्यवहार केला जाणार नाही.

१६. निविदेच्या कोणत्याही टप्प्यावर अथवा निविदा मंजुरीनंतर हा माझा कोणत्याही टप्प्यावर कागदपत्रांच्या विधीग्राह्यतेबाबत आक्षेप नोंदविला गेला तर ही बाब कायदा फौजदारी कार्यवाहीस पात्र राहील.

१७. मक्तेदारावर सोपवलेल्या कंत्राट कामाचा विमा कंत्राटदारांनी विमा संचालनालय महाराष्ट्र राज्य गृहनिर्माण भवन 264 पहिला मजला कलानगर बांद्रा (पूर्व) मुंबई 400 051 (दूरध्वनी क्रमांक संचालक 26591782/26590403 कार्यालय 26590609/26590746 फॅक्स क्र. 022-65902161) या कार्यालयाशी कंत्राटाचा संपूर्ण विमा उतरवणे बंधनकारक आहे. तसेच सदरचे कंत्राटी काम पूर्ण करण्यासाठी नियुक्त करण्यात येत असलेल्या सर्व कामगारांचा विमा कामगार नुकसान भरपाई विमापत्राखाली अटी व शर्तीनुसार उतरवणे अनिवार्य आहे. विमा संचालनालयाच्या व्यतिरिक्त आणि विमा कंपन्यांकडून घेतलेली विमा पत्रे स्वीकारली जाणार नाहीत.

१८. ज्या कंत्राटदार कंत्राटी कामाचा विमा उपरोक्त कार्यालयाकडून घेणार नाहीत तसेच या कार्यालयास विमा पॉलिसी घेतल्याचा पुरावा सादर करणार नाहीत किंवा जे कंत्राटदार कार्यरंभ आदेश घेताना कंत्राटी कामाच्या नियमाप्रमाणे 0.50 टक्के अथवा 1 टक्के रकमेचा धनाकर्ष देऊन विमा पत्र घेणार नाहीत अशा कंत्राटदारांच्या प्रथम देयकांमधून नियमाप्रमाणे 0.50 टक्के किंवा 1 टक्के रक्कम विमा हप्ता अथवा किमान विमा हप्ता रुपये 226/- यापैकी जी जास्त असेल ती वसूल करण्यात येईल व विमा पत्राच्या अटी व शर्तीनुसार उपरोक्त कार्यालयाकडून कारवाई करण्यात येईल.

१९. मक्तेदारांनी वरील  प्रमाणे कागदपत्रे सर्व  लिफाफा क्र.1 व लिफाफा क्र. 2 मध्ये जोडणी गरजेचे आहे त्यामध्ये अपुरी अथवा चुकीची कागदपत्रे जोडल्यास निविदा धारकाची निविदा मंजूर करण्यात येईल.

**-: स्वाक्षरीत :-**

**ग्रामपंचायत अधिकारी  / सरपंच**

**ग्रामपंचायत विडणी  ता.फलटण जि.सातारा**

Signature Not Verified

Digitally signed by ABHANG SAGAR KANTILAL
Date: 2026.05.14 10:24:37 IST
Location: Maharashtra-MH